तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,
पत्ता :- जुना मुंबई पुणे रोड, लिंब फाटयाजवळ,
तळेगाव दाभाडे ता. मावळ ,जि.पुणे पिन नं. ४१०५०६
फोन नंबर :- ०२११४-२२२४४४
E-mail :- pstalegaond.pcpc-maha@gov.in

तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे दिनांक २०/०५/२०२४

## तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे कडील गुन्हे प्रकटीकरण पथकाकडुन अग्निशस्त्राची कारवाई

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे हद्दीत मोठया प्रमाणात लोक वसाहत असुन गुन्हेगार हे बेकायदा बिगर परवाना अग्निशस्त्र/पिस्टल बाळगुन आहेत. त्याप्रमाणे त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करण्याबाबत मा.पोलीस आयुक्तसो, श्री.विनयकुमार चोबे यांनी आदेशित केलेले आहे. त्याप्रमाणे पोलीस उप निरीक्षक विलास गोसावी व पथक हे तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे हद्दीत गस्त करून गोपनीय बातमीदार व तांत्रिक तपासाचा वापर करून अग्निशस्त्र/पिस्टल बाळगणारे यांचा शोध घेत होते.

दिनांक २०/०५/२०२४ रोजी तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक विलास गोसावी, स.फौ.दिलीप कदम, पो.हवा.क्र. १४४६/किशोर गिरीगोसावी, पोलीस अंमलदार क्र.२१४५/प्रकाश जाधव, पोलीस क्र. ३०९०/प्रितम सानप, पोलीस अंमलदार क्र. ३०३४/हर्षद कदम असे तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असताना पोलीस अंमलदार क्र. ३०३४/हर्षद कदम यांना गोपनीय बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, काळया रंगाची स्कॉर्पिओ गाडी क्र.एम.एच. १२ ई.एम. ६६१५ ही पुणे-मुंबई जुना महामार्गाने मुंबईच्या दिशेने जात असुन त्यातील इसमांकडे पिस्टल आहे. त्याप्रमाणे पोलीस उप निरीक्षक विलास गोसावी व पथक यांनी सापळा लावुन काळया रंगाची स्कॉर्पिओ गाडी क्र.एम.एच. १२ ई.एम. ६६१५ ही घोराडेश्वर डोंगराच्या पायथ्यालगत असलेले पुणे-मुंबई जुना महामार्गाचे रोडलगत ताब्यात घेवुन सदर गाडीतील इसम नामे १) सचिन किसन शिंदे वय ३८ वर्षे, रा.गणपती मंदीराजवळ, लोणीकंद, ता.हवेली, जि.पुणे २) गौरव कमलाकर शिंदे वय २० वर्षे, रा.विठ्ठल रुक्मीणी मंदीराच्या पाठीमागे, लोणीकंद, ता.हवेली, जि.पुणे ३) अजिंक्य दादासो म्हस्कुटे वय २५ वर्षे, रा.विठ्ठल रुक्मीणी मंदीरापाठीमागे, खामगाव, ता.दौंड, जि.पुणे यांच्याकडे चौकशी करून सखोल तपास केला असता सदर इसमांकडे काळया रंगाचे लोखंडी पिस्टल मॅग्झीनसह आणि ०४ जिवंत राउंड मिळुन आले. त्याप्रमाणे तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे दाखल गु.र.क्र. २९६/२०२४ कलम भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१),१३५ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.

आरोपी यांच्यावर दाखल गुन्ह्यांची माहीती :-

| आरोपीचे नाव | गुन्हा नोंद क्र. | कलम (भादवि) | पोलीस ठाणे |
|---|---|---|---|
| सचिन किसन शिंदे | १५१/२०१२ | ३०७,१४३,१४७,१४८,१४९,५०६ | लोणीकंद पोलीस ठाणे |
| | ८०/२०२१ | ३०२ व इतर | लोणीकंद पोलीस ठाणे |
| गौरव कमलाकर शिंदे | ८०/२०२१ | ३०२ व इतर | लोणीकंद पोलीस ठाणे |
| | ३६०/२०२२ | ३,२५ भाहका | चिखली पोलीस ठाणे |
| अजिंक्य दादासो म्हस्कुटे | ३६०/२०२२ | ३,२५ भाहका | चिखली पोलीस ठाणे |

तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी आणि अंमलदार यांनी अतिशय शिताफीने व कौशल्यपुर्ण तपास करून आरोपी १) सचिन किसन शिंदे वय ३८ वर्षे, रा.गणपती मंदीराजवळ, लोणीकंद, ता. हवेली, जि.पुणे २) गौरव कमलाकर शिंदे वय २० वर्षे, रा.विठ्ठल रुक्मीणी मंदीराच्या पाठीमागे, लोणीकंद, ता.

Scanned with CamScanner

हवेली, जि.पुणे ३) अजिंक्य दादासो म्हस्कुटे वय २५ वर्षे, रा.विठ्ठल रुक्मीणी मंदीरापाठीमागे, खामगाव, ता. दौंड, जि.पुणे यांच्याकडुन पिस्टल ताब्यात घेतलेले आहे. मा.पोलीस आयुक्तसो श्री.विनयकुमार चोबे, मा.सह पोलीस आयुक्तसो श्री.वसंत परदेशी, मा.पोलीस उप आयुक्तसो श्री.बापु बांगर, मा.सहायक पोलीस आयुक्तसो श्री.देविदास घेवारे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.प्रदीप रायन्नवार, पोलीस उप निरीक्षक विलास गोसावी, स.फौ.दिलीप कदम, पो.हवा.क. १४४६/किशोर गिरीगोसावी, पोलीस अंमलदार क. २१४५/प्रकाश जाधव, पोलीस क.३०९०/प्रितम सानप, पोलीस अंमलदार क. ३०३४/हर्षद कदम यांनी केलेले आहे.

( बापु बांगर )
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ - २, पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner